**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची जबानी**

मी याव्दारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – सतिश बाजीराव शिंदे

माझे वय वर्षे ४० व्यवसाय– नोकरी

राहणार– सुगाव बु., ता. अकोले, जि.अहमदनगर

**सरतपास सहा.सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

१. दिनांक १३.०१.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजताचे सुमारास अकोले पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक श्री.विजय करे यांनी मला घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझेसोबत प्रविण शंकर मेंगाळ हे दुसरे पंच म्हणून हजर होते. पोलिसांनी आम्हाला अभिनव शिक्षण संस्था, अकोले येथे बोलावले होते. ते ठिकाण त्या संस्थेचे ऑफीस होते. ते कार्यालय सुमारे १५ फूट x १५ फूट क्षेत्राचे होते. त्या कार्यालयाचा मुख्य दरवाजा पूर्व बाजूला होता. घटनास्थळाच्या उत्तरेला मैदान व रस्ता आणि पूर्वेला, पश्चिमेला व दक्षिणेला संस्थेच्या इमारती होत्या. त्यानुसार पोलिसांनी माझेसमोर घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. पोलिसांनी तो पंचनामा मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली. आता मला तो पंचनामा दाखविला. त्या पंचनाम्यावरील अनुक्रमांक १ वरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. त्या पंचनाम्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी पी–३३** देण्यात आली.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री.बी.जी.वैद्य यांचे तर्फे–**

२. मी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, अकोले येथे रोजंदारीवर डेटा ऑपरेटर म्हणून काम करतो. प्रविण शंकर मेंगाळ हे देखील आमचे कार्यालयात काम

करतात. आमचे कार्यालय सोमवार ते शुक्रवार सुरु असते. मला पोलीस श्री.बडे यांनी बोलावले. पंचनाम्यासाठी जा, असा आमच्या कार्यालयाचा लेखी आदेश झाला होता किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी लेखी परवानगी न घेता कार्यालय सोडले होते. त्या दिवशी मी कार्यालय सोडताना इतर कर्मचारी हजर होते. आम्ही पोलिसांच्या गाडीतून घटनास्थळी गेलो.

**३.** अभिनव संस्थेचे प्रवेशद्वार उत्तरेला आहे. त्या दिवशी शाळा चालू होती किंवा कसे, हे माझ्या लक्षात नाही. त्या दिवशी मला शिक्षक, विद्यार्थी व गाड्या होत्या किंवा कसे, हे मी पाहिले नाही. आम्ही त्या संस्थेच्या प्रवेशद्वारातून आत जाताना गाडीतूनच गेलो होतो. ती गाडी कोणत्या दिशेला वळाली व कोठे उभी होती, हे माझ्या लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, मैदानाच्या पूर्व बाजूला इमारत व ऑफीस नाही.

**(मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास मध्यान्हाच्या वेळेपर्यंत तहकूब.)**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.10 18:28:14 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**दिनांक – १०.०९.२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**<u>मध्यान्हानंतर उलटतपास शपथेवर पुढे सुरू–</u>**

**४.** पोलिसांनी घटनास्थळाचा नकाशा तयार केला होता किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. पंचनाम्यामध्ये काय लिहिले आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलेलो नव्हतो व माझेसमोर कोणताही

पंचनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी सांगितल्यामुळे मी निव्वळ पंचनाम्यावर सही केली आहे. मी कोणत्या वारी गेलो होतो, हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्या दिवशी आमचे कार्यालय बंद होते. पंचनाम्या दिवशी दुसरा शनिवार होता किंवा कसे व त्या दिवशी आमचे कार्यालय बंद होते किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.09.10 18:28:21 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – १०.०९.२०२५**